सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on



सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ७८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## शिवसेनेत विलिनीकरणाच्या चर्चेसाठी बच्चू कडू तयार, पण ठेवली 'ही' अट

### पत्रकार परिषदेत मांडली भूमिका!




विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२९मुंबई-** गेल्या काही दिवसांपासून बच्चू कडूंची प्रहार संघटना एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत विलीन होणार असल्याची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. या विलिनीकरणानंतर बच्चू कडूंना शिवसेनेकडून विधानपरिषदेची उमेदवारी दिली जाईल, अशीदेखील शक्यता वर्तवली जात होती. या पार्श्वभूमीवर खुद्द बच्चू कडू किंवा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून कोणतीही अधिकृत भूमिका मांडली जात नव्हती. अखेर आज स्वत: बच्चू कडूंनी पत्रकार परिषद घेऊन या मुद्द्यावर सविस्तर भूमिका मांडली. यात विलिनीकरणासाठी सकारात्मक असल्याचे सूतोवाच बच्चू कडूंनी दिले. बच्चू कडूंनी यावेळी माध्यमांमधील चर्चांवर प्रतिक्रिया दिली. मलाही माहिती नव्हतं की मी विधानपरिषदेचा उमेदवार होऊ शकतो. उद्या मला विधानपरिषद उमेदवारी मिळाली, तर ती माध्यमांमुळे असेल. मी एका जातीचा किंवा धर्माचा माणूस नाही. मी शेतकरी-दिव्यांगांचं काम करणारा माणूस आहे. जर मला एकनाथ शिंदेंनी उमेदवारी दिली तर दिव्यांगांचा-मजुरांचा सन्मान होईल. आम्ही मुद्द्यांची लढाई लढणारी माणसं आहोत. आमचा जर विचार झाला, तर आमचे काही मुद्दे आहेत, असं बच्चू कडू म्हणाले.

यावेळी बच्चू कडूंनी विलिनीकरणाची पूर्वअट म्हणून काही मुद्दे मांडले. दिव्यांगांच्या उर्वरीत मुद्द्यांना प्राधान्य दिलं गेलं पाहिजे. शेतकऱ्यांसाठी हमीभावाचा मुद्दाही आहे. पदांसाठी युती करणारा बच्चू कडू नाही. इतर पक्ष तशा युती करतात. पण बच्चू कडू मुद्द्यांसाठी युती करेल. मुद्दे असतील, तरच आम्ही पुढचं पाऊल टाकू, असं ते म्हणाले.

विलीनीकरणाचा प्रस्ताव स्वीकाराल का? -चर्चा व्हायला पाहिजे. शेतकऱ्यांचे मुद्दे महत्त्वाचे आहेत. शिंदेंनी उमेदवारी दिली तर विधानपरिषदेत त्यांचे पाईक म्हणून काम करू, मेहनतीनं काम करू, शिवसेना किती वाढवायची त्यासाठीही प्रयत्न करू. शेतकऱ्यांच्या मुद्द्यासोबत जर मोठा पक्ष पाठिशी उभा राहात असेल तर त्यावर चर्चा होऊ शकते. पण चर्चेचा प्रस्ताव येतो की नाही ते पाहावं लागेल. निरोप आला तर भेटू आपण. भेटायला काय हरकत आहे? असा मुद्दाही त्यांनी मांडला.

### विलिनीकरणाच्या बातम्या वाचताना दु:ख झालं - बच्चू कडू

दरम्यान, शेतकरी मतदारांनी आपल्याला नाकारल्याची खंत यावेळी बच्चू कडूंनी बोलून दाखवली. प्रहार ही कार्यकर्त्यांनी निर्माण केलेली संघटना आहे. विलीनीकरणाच्या बातम्या मी वाचत होतो तेव्हा मला दु:ख वाटत होतं. मी पूर्वी शिवसैनिकच होतो. शिवसेनेच्या बंडखोरीतून प्रहारची निर्मिती झाली. आम्ही आजपर्यंत कुणाचाही पाठिंबा घेतला नाही. कायम तटस्थ भूमिका घेतली. प्रामाणिकपणे आणि तत्वाला धरून आम्ही काम केलं. फार लढलोय. कर्जमाफीची घोषणा झाल्यानंतर आम्हाला शेतकऱ्यांकडून अपेक्षा होती की ते आम्हाला शाबासकी देतील. पण ते झालं नाही. आज जनतेपर्यंत जाणारा बच्चू कडू नेत्यापर्यंत का जातोय याचं कारणही जनताच आहे. आम्हाला विधानसभेत हार खावी लागली. एकंदरीत देशातलं राजकारण जात, धर्माच्या ताकदीवर चालतं. काम करणाऱ्या कार्यकर्त्याला मागे राहावं लागतं, अशा शब्दांत बच्चू कडूंनी आपली भूमिका मांडली.

## सत्तेशिवाय राहू शकत नाहीत बच्चू कडू

### स्वत:च्या फायद्यासाठी कोणत्याही थराला जातात - आ. प्रवीण तायडे यांचा घणाघात

### दैनिक विदर्भ प्रजासत्ताक सोबत साधला विशेष संवाद



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती**

अचलपूर मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांच्यावर जोरदार टीका करत राजकीय वातावरण तापवले आहे. बच्चू कडू हे सत्तेशिवाय राहू शकत नाहीत, अशी बोचरी प्रतिक्रिया देत तायडे यांनी त्यांच्या राजकारणावर थेट हल्ला चढवला.आ.तायडे दैनिक विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना म्हणाले की, गेल्या २० वर्षांपासून बच्चू कडू हे सतत सत्तेत राहिले आहेत. जनतेने त्यांना भरभरून प्रेम दिले, मात्र त्यांच्या सत्तेची भूक अजूनही संपलेली नाही. जशी मासोळी पाण्याशिवाय राहू शकत नाही, तशी त्यांची अवस्था सत्तेविना झाली आहे. या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.यापुढे बोलताना तायडे यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या पक्षाचा या सर्व घडामोडींशी काहीही संबंध नाही. जो काही निर्णय घ्यायचा आहे, तो उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब घेतील, असे ते म्हणाले. मात्र, शिंदे यांनी ऑफर दिल्यानंतर बच्चू कडू स्वतःहून त्यांच्या पायाशी गेले का, हा नंतरचा मुद्दा असल्याचे सांगत त्यांनी कडू यांच्यावर उपरोधिक टीका केली.तायडे यांनी आणखी कठोर शब्दांत आरोप करत म्हटले की, पायात जाऊन पडण्याची त्यांना सवयच आहे. स्वतःचे भले कसे करून घ्यायचे, यामध्ये ते माहिर आहेत. त्यांच्या या वक्तव्याने राजकीय वातावरण अधिकच तापले असून, दोन्ही बाजूंमध्ये आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू होण्याची शक्यता आहे.तसेच, बच्चू कडू यांचा दुतोंडी स्वभाव संपूर्ण महाराष्ट्राला माहिती असल्याचा आरोप करत तायडे म्हणाले की, आजपर्यंत त्यांनी स्वतःचे राजकारण जिवंत ठेवण्यासाठी आणि अस्तित्व टिकवण्यासाठीच धडपड केली आहे.या तीव्र शब्दांत केलेल्या टीकेमुळे प्रहार संघटनेकडून काय प्रतिक्रिया येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांमध्ये या वादाचा पुढे काय परिणाम होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### मस्साजोग ग्रामपंचायत निवडणूकि मध्ये

## संतोष देशमुखांच्या पत्नी अश्विनी देशमुख पराभूत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९बीड-** गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या मस्साजोगच्या सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीत धक्कादायक निकाल समोर आला असून सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांचा पराभव झाला आहे. तर स्वरूपानंद देशमुख यांनी विजय मिळवला आहे. स्वरूपानंद देशमुख यांनी ९२ मतांनी विजय मिळवला आहे.

मस्साजोगच्या गावकऱ्यांनी अश्विनी देशमुख यांच्या विरोधात कौल दिल्याने आता अनेकांच्या भूवया देखील उंचावल्या आहेत. विजयानंतर स्वरुपानंद यांनी आनंद व्यक्त केला.

सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख विरुद्ध स्वरुपानंद देशमुख यांच्यात सरपंच पदासाठी थेट लढत झाली. अश्विनी देशमुख यांनी दिवंगत संतोष देशमुख यांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी साथ देण्याचे आवाहन केलं होतं. तर स्वरुपानंद देशमुख यांनी त्यांच्या कार्यकाळात गावासाठी केलेल्या कामांच्या जोरावर गावकऱ्यांकडे मतांचे दान मागितले होतं. अशातत आता अश्विनी देशमुख यांना मोठा फटका बसला आहे. स्वरूपानंद देशमुख यांना ९१४ एकूण मते मिळाली तर अश्विनी देशमुख यांना ८२२ मतं मिळाली आहेत. तर नोटाला आठ मतं मिळाली.

मी याआधी देखील संतोष देशमुख यांच्या न्यायाच्या लढाईत सामील होतो आणि इथून पुढं देखील मी संतोष देशमुख यांच्या न्यायासाठी लढणार, अशी प्रतिक्रिया स्वरुपानंद देशमुख यांनी दिली आहे.

माझ्यासाठी काम करणाऱ्या तरुण पोरांचा हा विजय आहे. हा स्वाभिमानी जनतेचा विजय आहे. येत्या काळात गावातली कामं कोण करू शकतो, हे जनतेने ओळखलं अन् मला विजयी केलं आहे, अशी प्रतिक्रिया स्वरुपानंद देशमुख यांनी दिली आहे.

## श्याम मानव यांचे आव्हान धीरेंद्र शास्त्रींनी स्वीकारले

### म्हणाले - ज्यांना खाज असेल, त्यांनी दरबारात यावे; आमच्याकडील विद्येचे सादरीकरण करू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९नागपूर**

पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री नागपूरच्या रेशीम बागेत २६ ते ३० एप्रिलपर्यंत श्री राम कथा करत आहेत. या दरम्यान धीरेंद्र शास्त्री आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे श्याम मानव यांच्यात श्रद्धा, अध्यात्म आणि विज्ञानावरून वाद वाढला आहे. श्याम मानव यांनी ८० लाख रुपयांचे आव्हान दिले होते. हे आव्हान धीरेंद्र शास्त्री यांनी स्वीकारले आहे. श्याम मानव यांनी धीरेंद्र शास्त्रींना १० लोकांची नावे, त्यांच्या वडिलांचे नाव, वय आणि मोबाईल नंबर अचूक सांगण्याचे आव्हान दिले आहे. तसेच, 'अतींद्रिय शक्ती'च्या परीक्षेसाठी बंद खोलीत ठेवलेल्या १० वस्तू ओळखायच्या आहेत.दोन्ही परीक्षांमध्ये किमान ९० टक्के अचूकता आवश्यक ठेवण्यात आली आहे. ही प्रक्रिया नागपूरमध्ये पत्रकारांच्या उपस्थितीत होईल. समितीकडून सांगण्यात आले की, धीरेंद्र शास्त्री यांना यश मिळाल्यास ८० लाख रुपये दिले जातील, अन्यथा याला लोकांच्या भावनांचा गैरफायदा घेणे मानले जाईल.हा वाद नवीन नाही. जानेवारी २०२३ मध्येही



नागपूरमध्ये श्याम मानव यांनी ३० लाख रुपयांचे आव्हान दिले होते. त्यावेळी आरोप होता की, धीरेंद्र शास्त्री दोन दिवसांपूर्वी कथा सोडून निघून गेले होते. मात्र बागेश्वर बाबांनी फेटाळून लावले होते.मंगळवारी कथेदरम्यान बाबांनी आव्हान स्वीकारत म्हटले, यावेळी आम्ही नागपुरातच आहोत. मध्य प्रदेशात नाहीत. एक तासासाठी नाही, तर पाच दिवसांसाठी आहे. कथेचा पंडाल लागलेला आहे. राज्य त्यांचे, शहर त्यांचे आणि मंच देखील त्यांचाच. मी एकटाच आहे. कुणाला काही खाज असेल, तर दरबारात या. आमच्याकडे जी विद्या असेल आणि जी शक्ती असेल, आम्ही तिचे सादरीकरण करू. आम्ही जादूगार नाही. आम्हाला ईश्वर जी प्रेरणा देईल, त्यानुसारच आम्ही लोकांचे मार्गदर्शन करू. ते आले तर त्यांनाही मार्गदर्शन करू.

## महाराष्ट्राचे AI धोरण जाहीर; हरित आयोग स्थापन, लंडनमध्ये आंबेडकर अध्यासन

**विदर्भ प्रजसत्ताक**

**दि.२९मुंबई-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महाराष्ट्र मंत्रिमंडळ बैठकीत राज्याच्या विकासाला गती देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यामध्ये सर्वाधिक लक्षवेधी निर्णय म्हणजे महाराष्ट्राचे कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) धोरण २०२६ जाहीर करणे, हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना आणि लंडनमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या




नावाने अध्यासन केंद्र सुरू करण्याचा निर्णय होय.

राज्य सरकारने एआय क्षेत्रात मोठे पाऊल टाकत १० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या धोरणातून सुमारे दीड लाख रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. राज्यभर एआय विकासाचा समतोल राखण्यासाठी सहा एआय उत्कृष्टता केंद्र तसेच पाच एआय इनोव्हेशन सिटीज स्थापन करण्यात येणार आहेत. यामुळे महाराष्ट्र एआय पायाभूत सुविधा आणि संशोधन क्षेत्रात देशात आघाडीवर राहण्याचा प्रयत्न करत आहे.सामाजिक समता वर्षानिमित्त राज्य सरकारने आंतरराष्ट्रीय पातळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स येथे कायमस्वरूपी अध्यासन स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या अध्यासनाच्या माध्यमातून आंबेडकरांच्या नावाने डॉक्टरेट विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे, ज्यामुळे जागतिक स्तरावर त्यांच्या विचारांचा अभ्यास वाढण्यास मदत होईल.

पर्यावरण संरक्षणासाठी हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात ३०० कोटी वृक्ष लागवडीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्याचे नियोजन असून, पायाभूत सुविधा प्रकल्पांचे पर्यावरणपूरक नियोजन आणि अंमलबजावणी या आयोगामार्फत केली जाणार आहे.ऊर्जा क्षेत्रातही महत्त्वाचा निर्णय घेत मॅजेस्टिक योजनेद्वारे हरित ऊर्जेचा वापर आणि वीज पारेषण क्षमतेत वाढ करण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे. या योजनेसाठी जागतिक बँकेकडून कर्ज मिळविण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्याला मंजुरी देण्यात आली आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीत भरीव वाढ करत शिक्षणाच्या संधी अधिक व्यापक करण्यात आल्या आहेत. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील नाचणे येथे केंद्रीय विद्यालयासाठी जमीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. आदिवासी आश्रमशाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित प्रगती योजना लागू करण्यालाही मान्यता देण्यात आली आहे.

एकूणच, या बैठकीत घेतलेले निर्णय राज्याच्या तंत्रज्ञान, पर्यावरण, शिक्षण आणि सामाजिक न्याय या सर्वच क्षेत्रांतील प्रगतीचा रोडमॅप ठरतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सरपंचपदाच्या निवडणुकीत चाकणकरांचा भाऊ पराभूत

### तटकरेंची दिवेआगर ग्रामपंचायत गेली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९मुंबई -** राज्यातील काही ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची पोटनिवडणूक आज पार पडली. त्यात अनेक धक्कादायक निकाल लागलेत. बीडच्या मस्साजोगमध्ये दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नीचा पराभव झाला, तर तिकडे दौंडमध्ये सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांच्या भावाचाही पराभव झाला. कोकणात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा बुरूज ढासळला आहे. इथे दिवेआगर ही महत्त्वाची ग्रामपंचायत त्यांच्या हातून गेली आहे. यामुळे त्यांनाही जबर झटका बसला आहे.

रुपाली चाकणकर ह्या भोंदू अशोक खरात प्रकरणात अडचणीत सापडल्या आहेत. यामुळे त्यांना प्रथम राज्य महिला आयोगाचे




अध्यक्षपद व नंतर सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे महिला प्रदेशाध्यक्षपद गमवावे लागले होते. त्यानंतर आता त्यांना त्यांच्या भावाच्या पराभवाचाही धक्का सहन करावा लागला आहे. दौंडच्या नांदूर ग्रामपंचायत निवडणुकीत रुपाली चाकणकर यांचा सख्खा भाऊ संतोष बोराटे यांचा पराभव झाला आहे. विशाल नरेंद्र थोरात यांनी त्यांना ३०४ मतांनी पराभवाची धूळ चारली. स्थानिकांच्या मते, संतोष बोराटे यांच्या कार्यपद्धतीमुळे गावात नाराजी होती. त्यातूनच त्यांचा पराभव झाला.

तटकरेंना दिवेआगरमध्ये पराभवाचा धक्का

दुसरीकडे, रायगड जिल्ह्यातील १८ ग्राम पंचायतींसाठी काल निवडणूक झाली. त्यात श्रीवर्धनधील दिवेआगर ग्रामपंचायतीमधील निवडणुकीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. येथे दिवेआगर विकास आघाडीचे नेते विजय तोडणकर सरपंच म्हणून निवडून आलेत. श्रीवर्धन हा मंत्री अदिती तटकरे व खासदार सुनील तटकरे यांचा बालेकिल्ला मानला जातो. येथे त्यांच्या पॅनलचा पराभव झाल्यामुळे त्यांना जबर धक्का बसला. दिवेआगारला मनमानी, हुकूमशाही व लोकांना गृहीत धरण्याचे राजकारण चालणार नाही, असा इशारा नवनिर्वाचित सरपंच विजय तोडणकर यांनी या प्रकरणी खासदार सुनील तटकरेंना दिला आहे.

## उद्धव ठाकरे महाविकास आघाडीकडून उमेदवार नसणार

### अंबादास दानवे विधान परिषदेवर जाणार, आदित्य ठाकरे यांची घोषणा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९मुंबई-** विधान परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा अधिकृत चेहरा कोण असेल, यावरून सुरू असलेल्या सस्पेन्सचा अखेर पडदा फासला आहे. स्वतः उद्धव ठाकरे या निवडणुकीत उमेदवार असतील, अशी शक्यता वर्तवली जात असतानाच, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी आज मोठी घोषणा केली. महाविकास आघाडीकडून अंबादास दानवे विधान परिषदेच्या रिंगणात उतरणार असून, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीच हा निर्णय घेतल्याचे आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट केले.

गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात उद्धव ठाकरे पुन्हा एकदा विधान परिषदेवर जाणार असल्याची जोरदार चर्चा होती. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया सुळे आणि काँग्रेस नेत्यांनीही उद्धव ठाकरे यांनी स्वतः उमेदवार व्हावे, अशी भूमिका वारंवार मांडली होती. मात्र, उद्धव ठाकरे यांनी या प्रस्तावाऐवजी पक्षातील आक्रमक चेहरा आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यावर विश्वास दर्शवला आहे.

उद्धव ठाकरे यांनी २०२० साली विधान परिषदेवर प्रवेश केला होता आणि त्यांचा आमदारकीचा कार्यकाळ १३ मे रोजी संपणार आहे. त्यामुळे त्यांच्या जागी कोण जाणार याची उत्सुकता सर्वांनाच होती. उद्धव ठाकरेंच्या नावाची चर्चा सुरू असताना, ठाकरेंनी अंबादास दानवेंना संधी देण्याचा निर्णय घेतला आहे.

विधान परिषदेची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर अंबादास दानवे यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. उद्धव ठाकरे साहेबांचे मी आभार मानतो. पक्षाने शिवसेना प्रमुखांच्या आशीर्वादाने मला जबाबदारी दिलेली आहे. उद्धव ठाकरेंनी सभागृहात यावे, अशी आमची सगळ्यांची भूमिका होती. परंतु, उद्धवजींनी एका सामान्य सैनिकाला त्यांची जागा सभागृहात दिली. उद्धव ठाकरेंनी सगळ्या नेत्यांशी चर्चा करून, मला उमदेवारी देण्याचा निर्णय घेतला असे वाटते. मी याआधीही सभागृहात होतो. आता एका गॅपनंतर पुन्हा सभागृहात येतोय, असे अंबादास दानवे म्हणालेत.

काँग्रेसच्या भूमिकेकडे लक्ष

उद्धव ठाकरे यांनी स्वतः उमेदवारी नाकारल्यामुळे आता महाविकास आघाडीची रणनीती काय असेल?, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. काँग्रेसला हा निर्णय मान्य आहे का? या पार्श्वभूमीवर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून कोणती भूमिका घेतली जाते? हे पाहणे औत्सुक्याचे असणार आहे.

## संपादकीय ......

# तापमानवाढीची धग

जागतिक हवामान बदलांचे संकट दाराशी आले, त्याला दशकभराहून अधिक काळ लोटला आहे. आता दिवसागणिक त्याचे तीव्र चटके जगाच्या कोणत्या ना कोणत्या भागात अनुभवास येत आहेत. हजारो वर्षांपासून सुरू असणारे ऋतूचक्र जागतिक तापमानवाढीने बाधित झाले. ऋतूंची तीव्रता टीपेला पोहोचत आहे. फेब्रुवारी-मार्चनंतर वाढत जाणारे तापमान आणि कडक उन्हाळा असह्य पातळीवर पोहोचला आहे. महाराष्ट्रातील अकोला शहरामध्ये ४६.९ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली असून ते यंदाच्या मोसमातील देशातील सर्वाधिक ठरले. जगातील सर्वाधिक उष्ण शहरांच्या यादीमध्ये अकोल्याचे स्थान वरच्या दिशेने सरकले. विदर्भातील अमरावती, वर्धा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर या शहरांचे उष्णतामान कमी-अधिक फरकाने सारखेच आहे. दहा-पंधरा वर्षांपूर्वीपर्यंत राज्यात ४५ अंश हे उन्हाळ्यातील सर्वाधिक तापमान म्हणून नोंदवले जात असे.

हवामान खात्याच्या नोंदी पाहिल्यास १९ मे १९१२ रोजी चंद्रपुरात ५०.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले होते. नंतरच्या काळात ४७.९ अंश ही एक नोंद आहे. यंदा ती मोडीत निघणार असे दिसते. महाराष्ट्राच्या अंतर्गत भागात 'अँटिसायक्लोनिक' स्थितीमुळे उष्ण हवा जमिनीलगत साचून राहत आहे. निरभ्र आकाशामुळे सौरविकिरण थेट जमिनीपर्यंत पोहोचत असल्याने उष्णतेची तीव्रता अधिक जाणवत आहे, असे हवामान विभागाचे म्हणणे आहे. एखाद्या प्रदेशातील तापमान तिथल्या सरासरी कमाल तापमानापेक्षा ४.५ अंश सेल्सिअस ते ६.४ अंश सेल्सिअसने वाढते, तेव्हा त्याला 'उष्णतेची लाट' असे संबोधले जाते. १९७० च्या दशकानंतर अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील पृष्ठभागाच्या तापमानात झालेल्या वाढीमुळे भारतीय उपखंडातील उष्णतेच्या लाटा अधिक प्राणघातक ठरू लागल्या आहेत. १९९८, २००२, २०१५ आणि २०२२ मधील उष्णतेच्या लाटांनी भारताला प्रचंड हादरे दिले. १९९८ मध्ये ओडिशात आलेल्या लाटेने दोन हजारांहून अधिक बळी घेतले. २०१५ मध्ये आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये तापमानाने ४७ अंशांचा टप्पा ओलांडला होता. २०२२ चा उन्हाळा ऐतिहासिक ठरला. कारण, भारताने गेल्या १२२ वर्षांतील सर्वात उष्ण मार्च महिना अनुभवला.

या घटनांमागे अल निनोचा प्रभाव, आर्क्टिकमधील बर्फाचे वितळणे आणि स्थानिक पातळीवरील वाढते शहरीकरण (अर्बन हीट आयलंड इफेक्ट) ही प्रमुख कारणे आहेत. हवामान संशोधनात देशातील अग्रगण्य संस्था असणार्‍या पुण्यातील भारतीय उष्णदेशीय हवामानशास्त्र संस्थेच्या तीन शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनातून भारतातील वाढत्या तापमानाचे गंभीर वास्तव समोर आले आहे. तब्बल ४० वर्षांतील दैनंदिन नोंदींचे विश्लेषण करून शास्त्रज्ञांनी मांडलेल्या निष्कर्षांनुसार १९८० च्या तुलनेत २०२० पर्यंत उष्णतेच्या लाटांची वारंवारिता आणि तीव्रता लक्षणीय वाढली आहे. केवळ दिवसाचे कमाल तापमानच नाही, तर रात्रीचे किमान तापमानदेखील वाढत चालले आहे. पूर्वी केवळ उत्तर भारतात मर्यादित असणारी उष्णतेची लाट आता दक्षिण भारत आणि किनारपट्टीच्या भागांतही वेगाने पसरत आहे. हा भविष्यातील संकटाची पूर्वसूचना देणारा इशारा आहे.

वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होणारे 'हीट आयलंड' आणि जागतिक तापमानवाढीचा स्थानिक हवामानावर होणारा परिणाम याबाबत आगामी काळात शेती, सार्वजनिक आरोग्य आणि ऊर्जा व्यवस्थापन या क्षेत्रांतील सरकारी धोरणे ठरवताना पुनर्विचार करण्याची गरज आहे. तापमानवाढीच्या झळा व्यापक असून गोरगरीब, कष्टकर्‍यांना विशेषतः ग्रामीण भागाला याचा फटका सर्वाधिक बसतो. शेतमजूर, हमाल, फेरीवाले यांना सूर्याच्या तप्त किरणांनी होणारी होरपळ अपरिहार्यपणे सहन करत गुजराण करावी लागते. 'अल निनो' सक्रिय झाल्यामुळे येणार्‍या एक-दीड महिन्यात आणखी उष्णतेच्या लाटांचा सामना करावा लागू शकतो. झपाट्याने वाढत चाललेले प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान २.५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त झाल्यास त्याचे रूपांतर 'सुपर अल निनो'मध्ये होऊ शकते. तसे झाल्यास ती शतकातील भीषण नैसर्गिक आपत्ती ठरेल. १८७७-७८ मध्ये आलेला अल निनो हा मानवी इतिहासातील सर्वांत भीषण हवामान बदलांपैकी एक मानला जातो. या काळात प्रशांत महासागराचे तापमान असामान्यपणे वाढल्याने भारत, चीन, ब्राझील आणि आफ्रिकेत भीषण दुष्काळ पडून जगभरात सुमारे ३ ते ५ कोटी लोकांचा म्हणजे सुमारे ४ टक्के नागरिकांचा मृत्यू झाला होता.

आता काही हवामानशास्त्रज्ञ २०२६ ते २०२७ हा काळ आधुनिक इतिहासातील सर्वात उष्ण काळ ठरू शकतो, असे भाकित करत आहेत. शास्त्रज्ञांच्या मते, महासागरातील क्षारांचे वाढते प्रमाण 'अल निनो'ला अधिक शक्तिशाली बनवण्यासाठी पूरक ठरत आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या मते, २०३० पर्यंत उष्णतेमुळे कामाचे तास कमी झाल्याने भारताला जीडीपीच्या २.५ ते ४.५ टक्के हिस्सा गमवावा लागू शकतो. अतिउष्णतेमुळे बांधकाम क्षेत्र, वाहतूक आणि किरकोळ विक्री या क्षेत्रांतील कामगारांच्या कार्यक्षमतेत घट होते. त्याचा परिणाम उत्पादनावर होतो. अतिउष्णता आणि जलटंचाईमुळे कोरडवाहू पिकांसह अन्य शेतपिकांची हानी होऊन शेतकरी भरडला जातो. दाणा भरण्याच्या काळात तापमान वाढल्यास रब्बी हंगामातील गव्हाचे उत्पादन १० ते १५ टक्क्यांनी घटते.

# पाणी व स्वच्छतेत घोडसगावची झेप

## ग्राम स्वच्छता अभियानात द्वितीय क्रमांक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत अंजनगाव तालुक्यातील घोडसगाव ग्रामपंचायतीने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सन २०२५-२६ या वर्षासाठी अमरावती विभागातून घोडसगावला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला असून, पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. याबाबत विभागीय आयुक्त कार्यालयाकडून अधिकृत पत्राद्वारे माहिती देण्यात आली



आहे. शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत दरवर्षी गट, जिल्हा, विभाग व राज्य पातळीवर ही स्पर्धा राबविण्यात येते. या स्पर्धेत पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन, स्वच्छता उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, घन व द्रव कचरा व्यवस्थापन, शौचालय वापराची स्थिती तसेच ग्रामस्थांचा सक्रिय लोक सहभाग या निकषांवर मूल्यमापन केले जाते. घोडसगाव ग्रामपंचायतीने स्वच्छतेबाबत व्यापक जनजागृती करत शाश्वत उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली. घराघरात शौचालयांचा वापर सुनिश्चित करणे, नियमित स्वच्छता मोहिमा राबविणे, कचरा व्यवस्थापनाची कार्यक्षम प्रणाली उभारणे आणि पाणीपुरवठा व्यवस्थेचे सुयोग्य नियोजन या बाबींमुळे गावाने हा मानाचा बहुमान मिळवला.

या यशाबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब रायबोले तसेच पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुलकर्णी यांनी घोडसगाव ग्रामपंचायतीचे अभिनंदन केले आहे. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत इतर गावांनीही या आदर्शाचे अनुकरण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### घोडसगावची सातत्यपूर्ण यशस्वी कामगिरी

यापूर्वीही विविध अभियानात घोडसगाव ग्रामपंचायतीने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत सन २०२५-२६ मध्ये गटस्तर प्रथम, जिल्हास्तर प्रथम व विभाग स्तर द्वितीय, अश्या प्रकारे उत्कृष्ट कामगिरी करत एकत्रित १५ लाख ६० हजा इतक्या पुरस्कार निधीसाठी ग्रामपंचायत पात्र ठरली आहे.

# मुलाला किडनी देऊन दिले जीवनदान


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

स्थानिक डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात आणखी एक किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली. अंजनगावसुर्जी तालुक्यातील भंडारज येथील मध्यमवर्गीय कुटुंबातील एका पित्याने त्यांची किडनी देऊन मुलाचा जीव वाचविला. ३४ वर्षीय व्यावसायिक असलेली ही व्यक्ती गेल्या दिवाळीपासून त्रस्त होती. त्याला दम भरून येणे, बीपी वाढणे अशासारखा त्रास होत असताना स्थानिक पातळीवर तपासणी केली असता असे आढळले की त्याच्या दोन्ही किडन्या काम करीत नाहीत, अशा परिस्थितीत त्याला डायलिसीस सांगितले गेले. परंतु त्याने डायलिसिस घेतले नाही, या वळणावर डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालयात प्रत्यारोपण समन्वयक सतीश वडनेरकर यांनी त्याला आजाराबाबत व प्रत्यारोपणाबाबत समूपदेशन केले.

कुटुंबातील आई, बाबांनी किडनी दिल्यास आपण पूर्ववत आयुष्य जगू शकतो, असा विश्वास त्याच्यात निर्माण केला. शहरातील नामांकित नेप्पोलॉजिस्ट डॉ. हितेश गुल्हाने यांच्याकडे उपचार घेणे सुरू केले. डॉ. गुल्हाने यांनी यावर किडनी प्रत्यारोपण हा उत्तम पर्याय असल्याचे सुचविले. तपासणीअंती त्याला किडनी देण्याकरिता त्याच्या वडिलांनी पुढाकार घेतला. त्यांनी मुलाला प्रेमापोटी व त्याचे आयुष्य चांगले व्हावे, हा दृष्टिकोन ठेवून किडनी देऊन जीवनदान दिले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवन टेकाडे, डॉ. सोमेश्वर निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली यूरोलॉजीस्ट डॉ. राहुल पोटोडे, डॉ. विक्रम देशमुख, डॉ. विशाल बाहेकर, डॉ. राहुल घुले, डॉ. प्रतीक चिरडे आदींनी परिश्रम घेतल्याने त्या व्यक्तीचा जीव वाचला असून तो चांगले आयुष्य जगू शकणार आहे.

# उन्हाळी पिकांची लागवड वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती -** यंदा उन्हाळी पीक लागवडीस मोठा प्रतिसाद मिळाला आहे. कृषी विभागाने आठ हजार ५४ हेक्टरवर उन्हाळी पिकांच्या लागवडीचे नियोजन केले असताना दीडपट म्हणजे १३ हजार ५७६ हेक्टरवर पिकांची लागवड झाली आहे. यामध्ये साधारणतः भुईमूग, तीळ, मूग, कांदा व मका, या प्रमुख पिकांचा समावेश आहे. जिल्ह्यात यंदा खरिपानंतर काही प्रमाणात रब्बीलाही हवामानातील बदलाचा फटका बसला आहे. त्यामुळे या नुकसानाची भर काढण्याकरिता शेतकऱ्यांनी उन्हाळी पिकांना अधिक महत्त्व दिल्याचे दिसून येत आहे.



जिल्ह्यात उन्हाळी पिकांसाठी आठ हजार ५४ हेक्टर क्षेत्रावर नियोजन करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात १३ हजार ५६७ हेक्टरवर पिकांची लागवड करण्यात आली आहे. याची सरासरी १६८ टक्के एवढी आहे. अमरावती, नांदगाव खंडेश्वर आणि मोर्शी, या तालुक्यात तर विक्रमी पेरणी झाली आहे. यात अमरावतीमध्ये ६६४ टक्के, नांदगाव ३०८ तर मोर्शी तालुक्यात सर्वाधिक ८७८ टक्के उन्हाळी पिकांची लागवड करण्यात आली आहे. बहुतांश तालुक्यात दीडशे टक्क्यांवर पेरणी झाल्याचे आकडेवारीत नमूद आहे. उन्हाळी पिकांमध्ये तिळाची सर्वाधिक २५१६ हेक्टरवर लागवड करण्यात आली आहे. त्यापाठोपाठ भुईमूग, मूग, कांदा, मका, ज्वारी, भाजीपाला या पिकांचा समावेश आहे.

पीकनिहाय लागवड मका : १५४१, तृण चारा : ५१२, उन्हाळी ज्वारी : ६३४, भुईमूग : २३६८, तीळ : २५१६, मूग : २१७८, कांदा : १७७६, भाजीपाला : ९३२ (आकडे हेक्टरमध्ये)

# अमरावती विद्यापीठाचे सेवा गौरव पुरस्कार जाहीर

## १ मे रोजी पुरस्काराचे वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती -** अमरावती विद्यापीठाचे या वर्षीचे उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले असून महाराष्ट्र दिनी १ मे, २०२६ रोजी विद्यापीठ परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहामध्ये कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे. महाविद्यालयीन स्तरावर उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील सर्वसाधारण वर्गवारीत प्राचार्यांमधून इंदिरा महाविद्यालय, कळंबचे प्राचार्य डॉ. पवन मांडवकर, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक सर्वसाधारण वर्गवारीत गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार येथील प्राध्यापक तथा रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. नंदकिशोर गव्हाळे, महिला राखीव वर्गवारीत शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील प्राध्यापक तथा प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयश्री धोटे, संलग्नित महाविद्यालयांतील सर्व स्तरावरील शिक्षकेतर सर्वसाधारण वर्गवारीत कर्मचार्यांमधून इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती येथील अधीक्षक प्रशांत देशमुख यांना उत्कृष्ट सेवेबद्दल पुरस्कार जाहीर झाला आहेत.





विद्यापीठ स्तरावर विद्यापीठ महिला राखीव वर्गवारीत शिक्षकांमधून गृहविज्ञान विभागातील प्राध्यापक डॉ. संयोगिता विलास देशमुख, विद्यापीठ प्रथम श्रेणी सर्वसाधारण वर्गवारीत अधिकार्यांमधून परीक्षा विभागातील सहाय्यक कुलसचिव मिलींद देशपांडे, विद्यापीठ प्रथम श्रेणी महिला राखीव वर्गवारीत अधिकार्यांमधून महाविद्यालयीन विभागातील सहाय्यक कुलसचिव डॉ. साक्षी ठाकूर, विद्यापीठ द्वितीय श्रेणी सर्वसाधारण वर्गवारीत अधिकार्यांमधून आस्थापना विभागातील अधीक्षक अमोल म्हैसाळकर, व्दितीय श्रेणी महिला राखीव वर्गवारीत अधिकार्यांमधून परीक्षा विभागातील अधीक्षक स्मिता म्हैसाळकर, विद्यापीठ तृतीय श्रेणी सर्वसाधारण वर्गवारीत कर्मचार्यांमधून वित्त विभागातील वरिष्ठ सहाय्यक संजय कोकाटे, तृतीय श्रेणी महिला राखीव वर्गवारीत कर्मचार्यांमधून ग्रंथालय सहाय्यक ज्योती गेडाम, तसेच विद्यापीठ चतुर्थ श्रेणी सर्वसाधारण वर्गवारीत कर्मचार्यांमधून सामान्य प्रशासन विभागातील चौकीदार मोरेश्वर मुंजाळे यांना उत्कृष्ट सेवेबद्दल पुरस्कार जाहीर झाला आहे. महाविद्यालयातील शिक्षक सर्वसाधारण वर्गवारीत गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार येथील प्राध्यापक तथा रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. नंदकिशोर गव्हाळे, महिला राखीव वर्गवारीत शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील प्राध्यापक तथा प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयश्री धोटे, संलग्नित महाविद्यालयांतील सर्व स्तरावरील शिक्षकेतर सर्वसाधारण वर्गवारीत कर्मचार्यांमधून इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती येथील अधीक्षक प्रशांत देशमुख यांना उत्कृष्ट सेवेबद्दल पुरस्कार जाहीर झाला आहेत.

# अकरावी प्रवेश प्रक्रिया पाच फेऱ्यांत

## यंदाही ऑनलाईन प्रणाली कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती-** राज्यात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले असून ही संपूर्ण प्रक्रिया पाच फेऱ्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागाने २७ एप्रिल २०२६ रोजी यासंदर्भात अध्यादेश जारी करून प्रवेश प्रक्रियेत अधिक सुसूत्रता आणण्याचा निर्णय घेतला आहे.यंदाही अकरावीचे प्रवेश गुणवत्तेनुसार ऑनलाईन पद्धतीनेच होणार असून पहिल्या तीन फेऱ्या नियमित असतील. त्यानंतर मुलींसाठी विशेष फेरी आयोजित करण्यात येणार आहे. शेवटच्या टप्प्यात सर्व विद्यार्थ्यांसाठी खुली प्रत्यक्ष प्रवेश फेरी राबविण्यात येईल. अशा प्रकारे एकूण पाच टप्प्यांत



प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.दरम्यान, एचएसव्हीसी (व्यावसायिक) अभ्यासक्रमांचे प्रवेश मात्र शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून ऑफलाईन पद्धतीने, थेट शाळा स्तरावर घेण्यात येणार आहेत. तसेच आदिवासी, सामाजिक न्याय व इतर विभागांच्या राज्य मंडळ संलग्न शाळांना संबंधित विभाग प्रमुखांची मान्यता मिळाल्यास या प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. ही मान्यता ३० एप्रिल २०२६ पूर्वी देणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.विद्यार्थ्यांना एका अर्जाद्वारे कला, वाणिज्य किंवा विज्ञान शाखांपैकी प्रत्येक फेरीत एकाच शाखेची निवड करता येईल. मात्र, प्रत्येक फेरीत शाखा बदलण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे. तसेच व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश शेवटच्या फेरीपर्यंत चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी कठोर नियम लागू करण्यात आले आहेत. बनावट कागदपत्रे सादर केल्यास संबंधित विद्यार्थ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच दहावीच्या गुणपत्रिकेत फेरफार केल्याचे आढळल्यास अशा विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येणार आहे.दरम्यान, अकरावीचे वर्ग १५ जुलै किंवा त्यापूर्वी सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

# जिल्ह्यात सहा बालविवाह रोखले

## प्रशासकीय यंत्रणेची सतर्कता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती-** जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंधासाठी राबविण्यात येत असलेल्या मोहिमेला एप्रिल महिन्यात उल्लेखनीय यश मिळाले असून विविध यंत्रणांच्या समन्वयातून एकूण ६ बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले आहे.




बालविवाह होणार असल्याची गोपनीय माहिती मिळताच महिला व बाल विकास विभाग, पोलिस प्रशासन, बाल संरक्षण यंत्रणा व बाल कल्याण समिती यांच्या संयुक्त पथकांनी तात्काळ हस्तक्षेप करून हे विवाह थांबविले. संबंधित पालक व कुटुंबियांचे समुपदेशन करून बालविवाहाचे दुष्परिणाम तसेच कायदेशीर परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या कारवाईमुळे संबंधित बालकांचे शिक्षण, आरोग्य व सुरक्षित भविष्य जपण्यात मदत झाली असून, समाजात सकारात्मक संदेश पोहोचला आहे. बालविवाह प्रतिबंधक कायद्याअंतर्गत बालविवाह करणे हा दंडनीय गुन्हा असल्याचे प्रशासनाने पुन्हा अधोरेखित केले आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या परिसरात बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास त्वरित १०९८ चाईल्ड हेल्पलाईन किंवा जवळच्या पोलिस ठाण्यात संपर्क साधावा. बालविवाहमुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# गाडगेबाबांच्या जन्मगावातील माध्यमिक शाळा बंद, विद्यार्थ्यांनी धरला दुसऱ्या गावचा रस्ता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९शेंडगाव**



लोकशिक्षणाचे विद्यापीठ असलेल्या संत गाडगेबाबा यांच्या जन्मगावातील व त्यांच्या नावानेच असलेली माध्यमिक शाळा बंद झाल्याची धक्कादायक स्थिती आहे. एकीकडे गाडगेबाबांच्या नावाने कोट्यवधी रुपयांच्या इमारती या गावात धूळखात पडल्या असताना गावातीलच शाळा बंद पडल्याने विद्यार्थ्यांना दुसऱ्या गावांचा रस्ता धरावा लागत आहे.

संत गाडगेबाबा यांचे जन्मगाव असलेल्या शेंडगाव येथे संत गाडगेबाबा जन्मभूमी स्मारक समिती, या नावाने १९७५ साली संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेला १९८२ मध्ये शाळा सुरू करण्यासाठी परवानगी मिळाली.

त्यावेळी रावसाहेब साबळे, पांडुरंग जानोरकर, नानासाहेब साबळे, गणेशराव काटकर, नरेंद्र साबळे, अजबराव साबळे, बाबूराव काळे, वासुदेवराव गावनेर, ओंकारराव साबळे यांची नावे कार्यकारिणीत होती. त्यापैकी विठ्ठलराव ऊर्फ नानासाहेब साबळे हयात आहेत. आजपर्यंत हजारो विद्यार्थी या संस्थेतून शिक्षण घेऊन निघाले. अनेक विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळविला आहे. गावाची लोकसंख्या ११०० असली तरी परिसरात १० गावांतील विद्यार्थी पाचवी ते १२ पर्यंत कला व वाणिज्य शिक्षण घेत होते. आज पाच ते दहापर्यंतचे वर्ग बंद करण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही शाळा सुरू करण्यात आली होती. परंतु इंग्रजी शाळांचे फॅड ग्रामीण भागातसुद्धा पोहोचले व या शाळेत काळानुरूप बदल करण्यात न आल्याने हळूहळू विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली अन् शाळेला कुलूप लावण्याची वेळ आली. येथील कर्मचाऱ्यांचे अन्यत्र समायोजन करण्यात आले. विशेष म्हणजे ही शाळा बंद होण्याच्या मार्गावर असताना एकाही सामाजिक कार्यकर्ता, राजकारणी किंवा प्रशासकीय अधिकाऱ्याने पुढाकार घेत ही शाळा कायम ठेवण्यासंदर्भात प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे संत गाडगेबाबा यांचे नाव घेऊन आपली राजकीय पोळी शेकणाऱ्यांबाबत प्रचंड संताप व्यक्त केल्या जात आहे.

कर्मयोगी संत गाडगेबाबा विद्यालयात पाचवी ते बारावीपर्यंतचे वर्ग होते. पाचवी ते दहावीचे वर्ग बंद झाले आहेत. बारावीची पटसंख्या चांगली आहे. या शाळेत फक्त तीन शिक्षक आहेत. त्यामुळे पालक मुलांना या शाळेत टाकत नाहीत. गाडगेबाबांची शाळा बंद पडणे ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. – प्रवीण जानोरकर, शेंडगाव

# जिल्ह्यातील पाच जणांना युवा पुरस्कार जाहीर

## दोन संस्थांचीही निवड : पोलिस कवायत मैदानावर महाराष्ट्रदिनी वितरण सोहळा



श्रीनिवास पोकळे अमर वानखडे जानव्ही राऊत वेदांत मुंदाने पूजा गुंजरकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

राज्य शासनाच्या वतीने २०२४–२५ व २०२५–२६ करिता जिल्हा युवा पुरस्कारासाठी अमरावती जिल्ह्यातून पाच जणांची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा एक मे रोजी शहर पोलिस कवायत मैदानावर शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत होणार आहे. २०२४–२५ करिता श्रीनिवास गणेश पोकळे (विशेष पुरस्कार), अमर पुरुषोत्तम वानखडे व जानव्ही राजेंद्र राऊत, श्री संताजी बहूद्देशीय शिक्षण संस्था, गुरुदेवनगर, गुरुकुंज आश्रम, (ता. तिवसा) तसेच २०२५–२६ करिता वेदांत रामचंद्र मुंदाने, पूजा सुनील गुंजरकर, स्वामी विवेकानंद विचार मंच बहूद्देशीय संस्था, अचलपूर यांची पुरस्कारासाठी समितीमार्फत निवड करण्यात आली, असे जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी सांगितले.

अमर पुरुषोत्तम वानखडे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युवक विचार मंचची स्थापना करून राज्यभर युवकांचे संघटन करून कार्य केले. जानव्ही राऊत या मोर्शी तालुक्याच्या नया वाठोडा येथील रहिवासी असून, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युवती विचार मंचची सचिव म्हणून कार्य करीत आहेत.


ग्रामीण भागात कीर्तन व प्रवचन करून युवतींना संघटित करण्याचे काम त्या करीत आहेत. श्री संताजी बहूद्देशीय शिक्षण संस्थेकडून गरीब व आदिवासी विद्यार्थ्यांना मदत केल्या जाते.

त्यांचीही पुरस्कारासाठी निवड झाली. त्याचप्रमाणे २०२५–२६ साठी वेदांत रामचंद मुंदाने यांना जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त झाला. कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्यासोबत त्यांनी २०० पेक्षा अधिक गावांतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. पूजा सुनील गुंजरकर यांनी 'मेरी मिट्टी मेरा देश' या अभियानात दिल्ली येथील कार्यक्रमात अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले आहे. संस्थेमधून या वर्षात स्वामी विवेकानंद विचार मंच बहूद्देशीय संस्था, अचलपूर यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

# कडक उन्हात 'कोचिंग'चा तडाखा!

## विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ थांबवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अचलपूर: –**



आकाशातून जणू आग ओकणारा सूर्य आणि वाढत चाललेले तापमान अशा जीवघेण्या उकाड्यातही अचलपूर-परतवाडा शहरासह तालुक्यात काही खाजगी कोचिंग क्लासेस व अवैध खासगी शिकवणी वर्ग सकाळी दहा वाजेनंतर सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची कोणतीही तमा न बाळगता केवळ आर्थिक फायद्यासाठी घेतले जाणारे हे वर्ग आता संतापाचे कारण ठरत आहेत.विद्यार्थ्यांना कडक उन्हात घराबाहेर पडून क्लासला जाण्याची सक्ती होत असून, यामुळे उष्माघात, निर्जलीकरण, थकवा यांसारख्या गंभीर आरोग्य समस्यांचा धोका वाढत आहे. विशेषतः लहान विद्यार्थी आणि किशोरवयीन मुलांवर याचा विपरीत परिणाम होत असल्याची पालकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त होत आहे.शिक्षण हे महत्त्वाचे असले तरी विद्यार्थ्यांचे आरोग्य त्याहून अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे अशा क्लासेसच्या वेळांमध्ये तातडीने बदल करणे गरजेचे आहे. सकाळी ६ ते ९ आणि संध्याकाळी ६ नंतर अशा वेळेतच शिकवणी वर्ग घेण्यात यावेत, अशी मागणी आता पालक व सुजाण नागरिकांकडून जोर धरत आहे.यासोबतच, अनेक ठिकाणी कोणतीही अधिकृत परवानगी न घेता सुरू असलेल्या अवैध शिकवणी वर्गांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशीही मागणी होत आहे. शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या अशा बेजबाबदार प्रकारांना आळा बसणे आवश्यक आहे.दरम्यान, संबंधित प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी तातडीने याची दखल घेऊन मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोचिंग क्लासेसवर कारवाई करावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.विद्यार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे हीच खरी जबाबदारी – अन्यथा 'शिक्षण' नावाखाली सुरू असलेला हा उकाड्यातील त्रास, भविष्यासाठी धोकादायक ठरू शकतो! असे जनतेचे म्हणणे आहे.

# बेमुदत बंदचा तिसरा दिवस

## कृषी विक्रेते मागण्यांवर ठाम, शेतकरी अडचणीत

विदर्भ प्रजासत्ताकदि.२९अमरावती ८तालुक्यातील कृषी साहित्य विक्रेत्यांनी पुकारलेल्या बेमुदत बंदचा आज, २९ एप्रिल रोजी तिसरा दिवस असून शहरासह संपूर्ण तालुक्यातील कृषी सेवा केंद्रे बंदच राहिल्याचे चित्र दिसून आले. शासनाकडून अद्याप कोणतीही ठोस भूमिका किंवा निर्णय जाहीर न झाल्याने आंदोलनकर्ते आपल्या मागण्यांवर ठाम असल्याचे दिसून येत आहे.दरम्यान, मंगळवार हा तिवसा शहराचा आठवडी बाजाराचा दिवस असल्याने तालुक्याच्या विविध भागांतून शेतकरी, व्यापारी आणि नागरिक मोठ्या संख्येने शहरात दाखल झाले होते. मात्र कृषी सेवा केंद्रे बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना बियाणे, खते, औषधे यांसारख्या अत्यावश्यक साहित्याची उपलब्धता न झाल्याने मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. अनेक शेतकरी रिकाम्या हाताने परतल्याने नाराजीचे वातावरण निर्माण झाले.शेतकऱ्यांच्या हंगामी कामांवर या बंदचा परिणाम होत असून पेरणीपूर्व तयारीवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करून विक्रेत्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.



# स्व. सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १ मे रोजी रक्तदान शिबिर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–** बुधवारा येथील आझाद हिंद मंडळाच्या वतीने शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख तथा विदर्भातील नामांकित सामाजिक कार्यकर्ते स्व. सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महाराष्ट्र दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर १ मे रोजी सकाळी ८.३० वाजता सुरू होणार असून दुपारी १२.३० वाजेपर्यंत चालणार आहे.बुधवारा येथील स्व. हरीभाऊ कलोती स्मारक येथे या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी आयोजित या शिबिरात जास्तीत जास्त युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाचे कार्याध्यक्ष तथा माजी महापौर विलास इंगोले यांनी केले आहे.



# मेळघाटच्या जंगलात पुन्हा पेटला वणवा

## वन्यप्राणी व वनसपंदेचे नुकसान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ धारणी** गुगामल वन्यजीव विभागाच्या ढाकणा परिक्षेत्राच्या जंगलात २७ एप्रिल रोजी दिवसभर जंगलातील झाडे जळत होती तर दुसरीकडे वन कर्मचारी, वन व्यवस्थापन समिती आणि फायरफायटर आगीवर नियंत्रणासाठी धडपडत होते. तसेच प्रादेशिक वनविभागाचे धारणी परिक्षेत्रातील बोड, लवादा व सोसोखडाच्या जंगलात गेल्या आठवड्यात ठिकठिकाणी आग लागून जंगलाचे नुकसान झालेले आहे.

धारणी परिसरात तापमान ४३ डिग्री सेल्सियसवर पोहचताच उष्णकटीबंधीय पानगळीच्या जंगलात ठिकठिकाणी आगी लागत आहेत. यामुळेच वनांचे नुकसान होऊन वन्यप्राण्यांना भटकंती करावी लागत आहे. जंगलातील वणव्यामुळे तापमान वाढून वन्यप्राण्यांना त्रास होतो. याशिवाय वणव्यात निवडक प्रजातीची हिरवीगार झाडे पण जळून जातात. सॅटेलाईटने माहिती मिळाल्यावर कर्मचार्यांना आगीच्या ठिकाणी पोहचण्यासाठी भरपूर प्रयत्न करावे लागतात. कारण दाट जंगलात अथवा पहाडांवर पोहचण्यासाठी रस्त्यांचा अभाव आहे. धारणीपासून ३० कि. मी. अंतरावरील ढाकणा परिक्षेत्रातील कवालडिंगरी, पिपरीकुवा, सुकडीहिंडा आणि बंदरझिरा नावाच्या जंगलात २७ एप्रिलला सकाळपासून आग लागलेली होती. आगीचे प्रमाण इतके जास्त होते की, ५ किमी अंतरावरून सुद्धा दिसत होते. या हंगामातील ही दुसरी मोठी आग होती. परिक्षेत्र अधिकारी मनोज चौधरी यांनी माहिती मिळताच पथकाला त्या ठिकाणी पाठविले. पारा ४३ अंशावर पोहचल्यानंतर जंगलातील वणवा नियंत्रित करणे फार अवघड मानले जाते. याशिवाय व्याघ्र प्रकल्प व प्रादेशिक वन विभागाजवळ पुरेशी साधने व मनुष्यबळाचा अभाव असल्याने आगीवर तात्काळ नियंत्रण करणे अशक्य होत असते. याशिवाय आगीचे नेमके कारण पण नेहमी गुलदस्त्यात राहते.

धारणी परिक्षेत्रामधील बोड, लवादा आणि सोसोखेडा नजिकच्या जंगलात पण गेल्या आठवड्यात तुरळक स्वरुपात ठिकठिकाणी आगी लागण्याची गंभीर माहिती आहे. आगीत औषधी वनस्पती आणि उन्हाळ्यात हिरवीगार असणारी झाडे सुद्धा जळून खाक होत असतात, हे एक मोठे दुर्दैवच आहे. आग लागताच जंगलातील तापमान वाढते, यामुळे वन्यप्राणी आणि पक्षांना फार त्रास होतो. प्रामुख्याने तृणभक्षी प्राण्यांवर भटकंतीची पाळी येत असते.

# दोन ठिकाणी १० लाखांची वीजचोरी

## नियमित देयक अदा करणाऱ्यांना मात्र आर्थिक फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अंजनगाव सुर्जी**



अमरावती, महावितरणच्या भरारी पथकाने अंजनगावच्या अकोट रोड व परतवाड्याच्या बैतूल कॉलनी येथे केलेल्या तपासणीत १० लाख ४ हजार १२२ रुपयांची वीजचोरी झाल्याची बाब उघडकीस आली. त्यात महावितरणला फटका बसला. अकोट रोड येथे संशयित अयुब खान युसूफ खान, मोहसीन खान युसूफ खान, या दोन वीज वापरकर्त्यांकडील मीटरची तपासणी केली असता त्यांनी इनकमिंग सर्व्हिस वायरला पांढऱ्या रंगाची वायर जोडून काही दिवसांपासून २८ हजार ९७४ युनीट वीज चोरून वापरली. त्यामुळे महावितरणला आठ लाख एक हजार ७८० रुपयांचा फटका बसला आहे. श्रीकांत पंजाब तळेगावकर यांच्या तक्रारीवरून अचलपूर पोलिसांनी संशयित दोन्ही ग्राहकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. वीजचोरीची दुसरी घटना अलबशीर कन्फेक्शनरी, अहमद कॉलनी, बैतूलनाका, परतवाडा येथे उघडकीस आली. येथे वरील पद्धतीनेच संशयित मोहमद शादाब शेख बशीर यांनी नऊ हजार १९० युनीट वीजचोरी केली. त्यामुळे महावितरणला दोन लाख १२ हजार ३४२ रुपयांचा फटका बसला. श्री. तळेगावकर यांच्या तक्रारीवरून संशयित मो. शादाबविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. एकीकडे अनेक ठिकाणी अवैध वीजचोरी होत असल्याने त्याचा फटका मात्र सामान्य व नियमित देयके भरणाऱ्या ग्राहकांना बसतो आहे.

## वीज पुरवठ्याशी संबंधित तक्रारी जलद गतीने सोडविण्यासाठी

# अमरावती शहरासाठी स्वतंत्र २४७ नियंत्रण कक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

वाढते तापमान, मान्सूनपूर्व कालावधी आणि आगामी पावसाळ्यात वीज पुरवठ्याशी संबंधित तक्रारींचा जलद निपटारा करण्यासाठी महावितरणने अमरावती शहरातील वीज ग्राहकांसाठी स्वतंत्र २४ तास कार्यरत नियंत्रण कक्ष सुरू केला आहे. शहरातील वीज ग्राहकांनी वीज पुरवठ्याशी संबंधित तक्रारी नोंदविण्यासाठी ७८७५७६७२८३ या भ्रमणध्वनी क्रमांकाचा वापर करावा, असे आवाहन कार्यकारी अभियंता राजेश घाटोळे यांनी केले आहे.




अमरावती शहरातील वाढती ग्राहक संख्या, सध्याची उष्णतेची लाट आणि आगामी मान्सूनचा विचार करून वीज पुरवठ्याशी संबंधित तक्रारींची तत्काळ नोंद व निवारण करण्यासाठी मुख्य अभियंत्यांच्या निर्देशानुसार स्थानिक पातळीवर तक्रार नोंदविण्याची प्रभावी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शहरासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष आणि शाखा कार्यालय निहाय भ्रमणध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहे.नियंत्रण कक्ष २४ तास, तीन पाळ्यांमध्ये कार्यरत राहणार आहे. ग्राहकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तत्काळ नोंद घेऊन संबंधित कर्मचारी किंवा कार्यालयाशी समन्वय साधून त्या तक्रारींचे जलद निवारण केले जाणार आहे. तसेच तक्रार निकाली निघाल्यानंतर त्याची माहिती संबंधित वीज ग्राहकांना देण्यात येणार आहे.यासोबत शेगाव शाखा कार्यालयासाठी ७८७५३९२९७२, रूक्मिणी नगर शाखा ७८७५३९३१८८, कँप ७८७५३९४४१४, वडाळी ७८७५३९३००५, गाडगे नगर ७८७५३९४३४६,पॉवर हाऊस ७८७५३९४१९३, कॉटन मार्केट ७८७५३९५०७४, बुधवारा ७८७५३९५२७१, जवाहर गेट ७८७५३९५३५९, राजकमल ७८७५३६३७५४, कडबी बाजार ७८७५७६३८०३, भाजी बाजार ७८७५३७४४२७, राजापेठ एक ७८७५३९६०१७, राजापेठ दोन ७८७५३९६०४७, पन्हालाल नगर ७८७५३९६२५१, नवाथे ७८७५३९६०२८, एमआयडीसी ७८७५३९६२९४, बजनेरा न्यू टाऊन ७८७५३९५८६९ आणि बडनेरा जुनी वस्तीसाठी ७८७५३९५८६३ हे भ्रमणध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहे.विशेषतः रात्री १० ते सकाळी ८ या कालावधीत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा रोज सकाळी आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यासाठी शहर विभागातील २१ शाखा अभियंत्यांना आळीपाळीने जबाबदारी देण्यात आली आहे.याशिवाय नियंत्रण कक्षाला आणि शाखा निहाय उपलब्ध करून दिलेल्या मोबाईलवर आलेले कॉलला प्रतिसाद देणे बंधनकारक करण्यात आले असून मुख्य अभियंता यांच्याकडून या कार्यालयांना सरप्राईज भेटी देखिल देण्यात येणार आहे.

# ७ लाख ८१ हजारांचा माल हडपला

## अपहरणानंतर शस्त्राची भीती दाखविल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,** मोर्शी येथून नागपूरच्या कंपनीत पाठविलेला सेमी कंडक्टरचा १७ लाख ८१ हजार रुपयांचा माल अपहरण करून व चाकूचा धाक दाखवून बळजबरीने लंपास करण्यात आला, असा आरोप अलीम खान सलीम खान (वय ४१, रा. पिंपळपुरा, मोर्शी) यांनी तक्रारीत केला आहे. मोर्शी पोलिसांनी सदर व्यक्तीच्या तक्रारीवरून संशयित महंमद नाजीम अली गुलाम खालिद खाँ (वय ४०), असरार अहमद सफात खान (वय ४०), वकील जीवन शुक्ला (वय ५२), चांद (वय ४८), इमरान व राकेशसह अन्य चौघे, अशा नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मोर्शीच्या पिंपळपुरा येथील अलीम खान सलीम खान (वय ४१) यांनी त्यांच्या तवक्कल ट्रेडिंग कंपनी येथून १६ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, खामगाव, जि. बुलडाणा यांच्याकडून लिलाव प्रक्रियेमध्ये ॲल्युमिनीयम कंडक्टरचा माल विकत घेतल्यावर मोर्शी येथे आणला होता. त्यानंतर ॲल्युमिनीयम कंडक्टरच्या मालाबाबत मोहंमद नाजीम अली गुलाम खाली खाँ, अवधान स्टील कंपनी, वानाडोंगरी, नागपूर यांच्यासोबत व्यवहार करून अलीम खान यांनी ४ हजार ८७० ॲल्युमिनीयम कंडक्टरचा १७ लाख ८१ हजार ४४६ रुपयांचा माल मालवाहू ट्रक भाड्याने घेऊन मोर्शी येथून नागपूरला पाठवला. त्यानंतर अलीम खान हे खासगी वाहनाने नागपूरच्या वानाडोंगरी येथे पोहोचले असता, संशयित नऊ जणांनी अलीम खान सलीम खान यांचे अपहरण केले. त्यांचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतल्यावर त्यांना जीवाने मारण्याची धमकी दिली तसेच शस्त्राचा धाक दाखविण्यात आला. जबरदस्तीने व्यवहाराच्या मालाची नोटरी करून १७ लाख ८१ हजारांचा माल, खोटी कागदपत्रे तयार करून नेला, असा आरोप अलीम खान सलीम खान यांनी मोर्शी ठाण्यात दाखल तक्रारीत केला. त्या आधारे पोलिसांनी संशयित नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## अमरावतीत अल्पवयीन मुलींच्या शोषणाचे धक्कादायक प्रकरण

# कथित टोळीचा तपास वेगात, चौघे आरोपी अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–** अमरावती शहरात अल्पवयीन मुलींची फसवणूक व शोषण केल्याच्या गंभीर प्रकरणाने खळबळ उडाली असून, पोलिसांनी आतापर्यंत चार आरोपींना अटक केली आहे. गाडगे नगर पोलीस ठाणे आणि नांदगाव पेठ पोलीस ठाणे येथे दाखल झालेल्या गुन्ह्यांमधून या प्रकरणाची व्याप्ती समोर आली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका युवतीच्या तक्रारीवरून नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ९ एप्रिल रोजी गाडगे नगर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या दोन स्वतंत्र तक्रारींमध्ये अल्पवयीन मुलींच्या छेडछाडी व शोषणाच्या प्रयत्नांचे प्रकार समोर आले. एका प्रकरणात आरोपीने अल्पवयीन मुलीला धमकावल्याचा आरोप आहे, तर दुसऱ्या घटनेत मुलीचे चित्रीकरण करून ब्लॅकमेल केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.या सर्व प्रकरणांमध्ये अटक करण्यात आलेले आरोपी एकमेकांच्या संपर्कात असल्याची प्राथमिक माहिती तपासातून पुढे आली आहे. त्यामुळे हे वेगवेगळे गुन्हे नसून यामागे संघटित स्वरूपाची टोळी कार्यरत असण्याची शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे.दरम्यान, या प्रकरणाबाबत राजकीय प्रतिक्रिया देखील उमटत आहेत. शिवराय कुळकर्णी यांनी



या घटनांकडे गंभीरतेने पाहण्याची गरज व्यक्त करत पोलिसांनी संपूर्ण रॅकेट उघड करण्याची मागणी केली आहे. त्यांनी काही पीडितांशी संवाद साधल्यानंतर आणखी मुली फसवल्या गेल्याची शक्यता व्यक्त केली असल्याचे सांगितले.तथापि, पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. तपास सुरू असून सर्व पुरावे, तक्रारी आणि संबंधित बाबींची पडताळणी केली जात आहे. दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.या प्रकरणामुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पालकांमध्ये चिंतेची भावना आहे. नागरिकांनी आपल्या मुलींना सतर्क राहण्याचे व कोणतीही संशयास्पद बाब त्वरित पोलिसांना कळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सध्या या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू असून, आणखी आरोपी किंवा संबंधित बाबी समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासन आणि पोलिस यंत्रणेची पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# २०० फुटांचा नियम तोडा, मेळघाट वाचवा!

## पाणीटंचाईवर संताप; ५०० फुटांपर्यंत बोरवेलला परवानगीची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९मेळघाट**

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात तीव्र पाणीटंचाईने भीषण रूप धारण केले असून, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी वणवण करावी लागत आहे. विशेषतः धारणी आणि चिखलदारा तालुक्यातील दुर्गम डोंगराळ भागात परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे.सध्या शासनाच्या नियमानुसार बोरवेल आणि हातपंपांची खोली २०० फुटांपर्यंत मर्यादित ठेवण्यात आली आहे. मात्र, स्थानिक भौगोलिक परिस्थिती पाहता ही मर्यादा अपुरी ठरत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात खाली गेल्याने २०० फुटांपर्यंत पाणी लागत नसल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे हा नियम शिथिल करून नवीन बोरवेलसाठी किमान ४०० ते ५०० फुटांपर्यंत खोली वाढविण्याची मागणी जोर धरू लागली आहे.राहुल येवले यांनी याबाबत शासनाकडे आक्रमक भूमिका घेतली असून, जुने नियम पाळून मेळघाटची तहान भागणार नाही. परिस्थितीनुसार निर्णय घेतला नाही, तर पाणीटंचाई आणखी भीषण होईल, असा इशारा दिला आहे.याशिवाय, परिसरातील अनेक बोरवेल, हातपंप आणि विहिरी जीर्ण अवस्थेत असून त्यांची दुरुस्ती तातडीने करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. प्रशासनाने केवळ कागदोपत्री योजना न राबवता प्रत्यक्षात कामे दर्जेदार आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करावीत, अशी मागणीही करण्यात आली आहे.धारणी आणि चिखलदारा तालुक्यात सुरू असलेल्या पाणीपुरवठा कामांबाबतही नाराजी व्यक्त होत आहे. काही ठिकाणी निकृष्ट दर्जाची कामे होत असल्याच्या तक्रारी समोर येत असून, यामुळे निधी वाया जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.अमरावती जिल्हा युवा काँग्रेसच्या वतीने प्रशासनाला इशारा देण्यात आला आहे की, पाणीटंचाईच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल. लोकांना पिण्याचे पाणी मिळत नसेल, तर विकासाच्या घोषणा निरर्थक आहेत, असा संतप्त सूर कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना मेळघाटातील परिस्थिती अधिकच बिकट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घेत बोरवेल खोली वाढविण्याबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी, तसेच सुरू असलेल्या कामांची काटेकोर तपासणी करून पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# नाल्यांतील काढलेला गाळ ३५ दिवसांपासून रस्त्यावरच

## नगरसेवक चंदू खेडकर यांचे ठिय्या आंदोलन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती –** अमरावती शहरातील शेगाव–रहाटगाव प्रभाग क्रमांक १ मध्ये नाल्यांच्या साफसफाईनंतर काढलेला गाळ तब्बल ३५ दिवसांपासून रस्त्याच्या कडेला पडून असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. महापालिकेने काही दिवसांपूर्वी नाल्या स्वच्छ करण्याची मोहीम राबवून गाळ बाहेर काढला; मात्र तो उचलून नेण्याची जबाबदारी असलेल्या कंत्राटदाराने अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही.या निष्काळजीपणाविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नगरसेवक चंदू खेडकर यांनी आज अनोखे आंदोलन छेडले. त्यांनी थेट गाळाच्या ढिगाऱ्याजवळ बसून ठिय्या आंदोलन सुरू केले. नाल्या स्वच्छ केल्या, पण गाळ तसाच ठेवल्याने दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि आजारांचा धोका वाढला आहे. नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे, असे खेडकर यांनी सांगितले.स्थानिक नागरिकांनीही या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला असून महापालिकेच्या ढिसाळ कारभारावर संताप व्यक्त केला. परिसरात अस्वच्छता वाढल्याने रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची तक्रार त्यांनी केली.दरम्यान, संबंधित कंत्राटदाराने गाळ उचलून नेण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप करण्यात येत आहे. महापालिकेने याकडे तातडीने लक्ष देऊन गाळ हटवण्याची मागणी करण्यात आली आहे.नगरसेवकांच्या या आंदोलनामुळे प्रशासनावर दबाव वाढला असून आता तरी महापालिका जागी होऊन तात्काळ कारवाई करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अकोल्यात ‘गेमिंग ॲप’वरून थरार!

# ‘लव्ह जिहाद’चा आरोप

## विवाहित मुस्लीम तरुणाने हरियाणातील तरुणीला पाच दिवस घरात डांबले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अकोला –** हरियाणातील एका हिंदू तरुणीची ‘गेमिंग प’ च्या माध्यमातून मुस्लीम तरुणांशी ओळख झाली. तरुणाने विवाहित असल्याची माहिती लपवून तरुणीसोबत चॅट करून प्रेमाच्या जाळ्यात ओढले. हरियाणातील त्या तरुणीला अकोल्यात बोलावून विवाहित तरुणाने पाच दिवस आपल्या घरात डांबून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार शहरात उघडकीस आला आहे. हा ‘लव्ह जिहाद’चा प्रकार असल्याचा गंभीर आरोप हिंदुत्ववादी संघटनांनी केला.

मुलींचे लैंगिक शोषण, धर्मांतरण आदी प्रकाराने महाराष्ट्र राज्य चांगलेच हादरले. आता अकोल्यातून लव्ह जिहादचा झाल्याचा आरोप होत आहे. प्रेमाच्या नावाखाली विवाहित तरुणाने तरुणीचे अपहरण करीत पाच दिवस घरात डांबून ठेवल्याचा प्रकार समोर आला. खदान पोलिसांनी तरुणीची सुटका केली. या घटनेनंतर परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता. विश्व हिंदू परिषद, बजरंग दलच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेऊन ‘लव्ह जिहाद’चा आरोप केला आहे.



आरोपी जमीर जाहीरउद्दीन या तरुणाचे आधीच लग्न झाले असून त्याला एक मुलगा देखील आहे. तो गेमिंग पवर ‘बादशाह’ या नावाने बनावट अकाउंट चालवतो. या माध्यमातून त्याची अनेक तरुणींशी ओळख आहे. त्यातील हरियाणा राज्यातील एका तरुणीसोबत त्याने जवळीक साधली, प्रेमाच्या नावाखाली तिला अकोल्यात बोलावले. त्या तरुणीने देखील अकोला गाठले. यानंतर गीतानगर भागात आरोपीने स्वतः च्या घरात पाच दिवस ठेवले.

या प्रकरणी हिंदुत्ववादी संघटनांनी आक्रमक भूमिका घेऊन लव्ह जिहादचा आरोप केला. पाच दिवसात तरुणीसोबत काय घडले, याचा सखोल तपास करावा, जमीरची आर्थिक परिस्थिती, कोणत्या संघटनांशी संलग्न आहे का, याचा देखील तपास झाला पाहिजे, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेने केली आहे.

# लग्नात बूट लपवण्यावरून चाकूचे सपासप वार!

## लग्नाच्या मांडवात रक्ताचा पाट




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ हिंगोली** एका विवाह सोहळ्यादरम्यान नवरदेवाचा बूट लपवण्याच्या क्षुल्लक कारणावरून तुफान राडा झाला आहे. सुरुवातीला शाब्दिक चकमक आणि धक्काबुक्की झाली. मात्र त्यानंतर थेट पोटात चाकूने वार करण्यात आले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे लग्नात एकच गोंधळ उडाला. या घटनेत वधू आणि वराकडील मिळून चौघेजण जखमी झाले आहेत.

हा संपूर्ण धक्कादायक प्रकार हिंगोलीच्या कळमकोंडा गावामध्ये घडला. येथे पातळे आणि मेने परिवाराचा विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता. वसमत तालुक्यातील गिरगाव येथील वऱ्हाडी मंडळी या विवाह सोहळ्यासाठी दाखल झाली होती. सकाळी पाहुणे मंडळी आल्यानंतर मोठ्या धुमधडाक्यात हा शुभविवाह पार पडला. पाहुण्यांनी जेवणही केले, मात्र कन्यादानाचा कार्यक्रम झाल्यानंतर नवरदेव नवरीला घेऊन निघण्याच्या तयारीत असताना प्रथा-परंपरेनुसार बूट लपवाछपीचा कार्यक्रम सुरू झाला आणि तिथेच हा राडा झाला. या दुर्दैवी घटनेमुळे विवाह सोहळ्याला गालबोट लागले आहे.

याप्रकरणी श्रावण फुलाजी गाढवे यांच्या तक्रारीवरून नवरदेवाकडील दोन जणांविरोधात हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झालेला नवरीकडील तरुण गणेश जगन डाळ (वय २२) याच्यावर हिंगोलीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयातील आयसीयू कक्षात उपचार सुरू आहेत. या लग्नाची हिंगोलीत जोरदार चर्चा सुरू असून काही व्हिडिओही सोशल मिडियावर व्हायरल झाले आहेत.

बूट लपवल्यानंतर मानपानाच्या आणि पैशांच्या देवाणघेवाणीवरून हा वाद विकोपाला गेला. रागाच्या भरात नवरदेवाकडील तरुणाने धारदार चाकूने गणेश डाळ याच्या पोटावर वार केले. लग्नमंडपात रक्ताचा सडा पडलेला पाहून वऱ्हाडी मंडळी सैरावैरा धावू लागली. घटनेची गांभीर्य लक्षात घेऊन हिंगोली ग्रामीण पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सध्या आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

# वीटभट्टीवरील मजुरांच्या मुलांचा शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती** रोजगाराच्या शोधात अमरावतीच्या वीट भट्टीवर कामासाठी येणाऱ्या मेळघाटातील मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यासाठी ‘खोज’ संस्थेचे संस्थापक ड. बंड्या साने, ब्रदर जोस व त्यांचे इतर सहकारी यांनी पुढाकार घेतला असून सदर विद्यार्थ्यांसाठी वीट भट्टीवर शाळा उघडावी, अशी मागणी केली आहे.मजुरांच्या मुलांसाठी ते ज्या ठिकाणी काम करतात, त्याच ठिकाणी शाळा उघडावी, अशी कायद्यात तरतूद आहे. परंतु दरवर्षी या मुलांची परवड होते. त्यांना त्या ठिकाणी शेड किंवा शालेय सामग्री उपलब्ध करुन दिले जाते ना त्यांच्यासाठी शिक्षकांची उपलब्धता करुन दिली जाते. त्यामुळे मजूर आई–वडिलांसोबत वीट भट्टीवर आलेल्या या मुलांना शिक्षणाचे कोणतेही धडे मिळत नाही. नेमका हाच मुद्दा संबंधितांना पुढे केला आहे. गेल्या दोन दिवसांपासून या मंडळीने विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मेळघाटचे

## मेळघाटमधील विद्यार्थ्यांचे प्रशासनाला साकडे



प्रकल्प संचालक आणि आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त यांच्या भेटी घेतल्या. विशेष म्हणजे या भेटीवेळी मजुरांची मुलेही त्यांच्यासोबत होती.

मेळघाटमध्ये मुख्यत्वे आदिवासी आणि कोरकू नागरिक आहेत. मजुरी हेच त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. मात्र दरवर्षी उन्हाळ्याच्या दिवसांत त्यांना तेथे काम उपलब्ध होत नाही. मनरेगाची कामे आहेत, असा दावा प्रशासन करित असले तरी वास्तविकता याहून उलट आहे. त्यामुळे नाईलाजास्तव या आदिवासी–कोरकू मजुरांना अमरावतीत येऊन वीटभट्ट्यांवर काम करावे लागते. घरात मुलांची काळजी घेण्याची जबाबदारीही त्यांच्यावरच असल्याने येताना ते आपली मुलेही सोबत घेऊन येतात. ..तर अधिकाऱ्यांच्या कार्यालयात ठाण मांडणार स्थानिक पातळीवर रोजगार नाही म्हणून वीट भट्टीवर कामासाठी येणाऱ्या मजुरांच्या मुलांसाठी शासनाने त्यांच्या कामाच्या ठिकाणी शिक्षणाची सोय करावी, अशी तरतूद आहे. परंतु ती वेळेत केली जात नाही, त्यामुळे दरवर्षी तेथील सामाजिक कार्यकर्त्यांना प्रशासनाशी भांडावे लागते. यावर्षीही तशीच स्थिती आहे. त्यामुळे संबंधितांनी त्या विद्यार्थ्यांसह अधिकाऱ्यांच्या कार्यालयात ठाण मांडण्याचे आंदोलन करु, असा इशारा दिला आहे.

# १ मेचा निकाल ठरणार खास; आता प्रगतीपुस्तकासोबत पाल्याच्या उत्तरपत्रिकाही पालकांना दाखवणे अनिवार्य

## शिक्षण विभागाचा नवा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती**

राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचा निकाल येत्या १ मे रोजी जाहीर होणार असून, यंदा शिक्षण विभागाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. हा निर्णय जाहीर करतांनाच एक क्रांतिकारी म्हटल्या जावू शकणारा निर्णय पण शिक्षण संचालनालयाने घेतला आहे. या दिवशी विद्यार्थी व पालक यांना प्रगतीपुस्तक देण्यात येते. त्यावरून पालकांस आपल्या पाल्याची गुणवत्ता निदर्शसनास येते. वर्षभर आपला मुलगा शाळेत जे काही शिकला, त्याचे मोघम मूल्यमापन होते.

शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ चा निकाल १ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केला जाईल. त्यानंतर २ मे २०२६ पासून राज्यातील सर्व राज्य मंडळाच्या शाळांना अधिकृतपणे उन्हाळी सुट्टी सुरू होईल. नवीन शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये सुसंगती आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. याच दिवशी एक महत्वाची घडामोड पण घडणार शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की, शैक्षणिक वर्ष २०२५–२६



चा निकाल १ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केला जाईल. त्यानंतर २ मे २०२६ पासून राज्यातील सर्व राज्य मंडळाच्या शाळांना अधिकृतपणे उन्हाळी सुट्टी सुरू होईल. नवीन शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये सुसंगती आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. याच दिवशी एक महत्वाची घडामोड पण घडणार.

**हाती उत्तरपत्रिका पण**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (छएझ २०२०) नुसार विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखणे आणि त्यांचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षक व पालकांचे संयुक्त कर्तव्य आहे. त्यादृष्टीने एक पाऊल टाकण्यात आले आहे. निकाल देतांना आता केवळ प्रगतीपुस्तक नं देता विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका पालकांना दाखविणे अनिवार्य करण्यात आले आहे. शिक्षण आयुक्तानी असे आदेश दिले आहेत.पालकांच्या निदर्शनास आणल्यामुळे पालकांना आपल्या पाल्याची संकल्पनात्मक समज, उत्तर लिहिण्याचे कौशल्य आणि नेमक्या चुका कोठे होत आहेत, याचे अचूक निदान करता येईल. केवळ गुणांवर लक्ष केंद्रित न करता, मुलांच्या कौशल्यांवर आधारित प्रगती मोजणे यामुळे शक्य होणार आहे.